Vol-13 Special Issue- 2.1 ISSN- 2349-7076

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter)
Patron: Prof. R. G. Kothari
Chief Editor: Prof. Jignesh B. Patel
Email:- Mo. 9429429550 ctefeduinspire@gmail.com

# समावेशित शिक्षणामध्ये कला आधारित शिक्षणाचा परस्पर संबंध

**डॉ. नीलिमा रामदास शेरेकर**
शासकीय अध्यापक महाविद्यालय अकोला


## सारांश (Abstract)

समावेशित शिक्षण ही अशी शैक्षणिक प्रक्रिया आहे ज्यामध्ये सर्व प्रकारच्या विद्यार्थ्यांना, मग ते सामान्य विद्यार्थी असोत किंवा विशेष गरजा असलेले विद्यार्थी असोत समान संधी उपलब्ध करून दिल्या जातात. प्रत्येक विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक क्षमता, गरजा आणि आवडीनिवडी लक्षात घेऊन शिक्षण दिले जाते. कला आधारित शिक्षण ही अशी अध्यापन पद्धती आहे ज्यामध्ये चित्रकला ,संगीत ,नृत्य ,नाट्य हस्तकला आणि विविध सर्जनशील उपक्रमाच्या माध्यमातून शिक्षण अधिक प्रभावी आणि आनंददायी बनवले जाते. समावेशी शिक्षणामध्ये कला आधारित शिक्षणाचा उपयोग विद्यार्थ्यांच्या बौद्धिक, सामाजिक, भावनिक आणि सर्जनशील विकासासाठी महत्त्वपूर्ण ठरतो प्रस्तुत शोधनिबंधात समावेशित शिक्षण आणि कला आधारित शिक्षण यांचा परस्पर संबंध महत्त्व उद्दिष्टे फायदे आणि अंमलबजावणीच्या उपयोजनांचा अभ्यास करण्यात आला आहे.


## प्रस्तावना

शिक्षण हा प्रत्येक बालकाचा मूलभूत हक्क आहे. भारत सरकारने बालकांच्या शिक्षणासाठी 2009 मध्ये शिक्षण हक्क कायदा केला वय वर्ष १४ पर्यंत शिक्षण घेण्याचा अधिकार बालकाला मिळाला व्यक्तीच्या विकासाचे शिक्षण हे महत्त्वपूर्ण साधन आहे .भारतामध्ये प्राथमिक शिक्षण सार्वत्रिकीकरणाचे उद्दिष्ट पूर्ततेसाठी 'सर्व शिक्षा अभियान' हा कार्यक्रम हाती घेण्यात आला. या अंतर्गत समाविष्ट विविध योजनांपैकी एक महत्त्वपूर्ण योजना म्हणजे अपंगांसाठी समावेशित शिक्षण होय. सामान्य बालकाबरोबरच अपंग, अंध, कर्णबधिर ,अध्ययन अक्षम मुलांना शिक्षण घेण्याचा अधिकार आहे .म्हणजेच समाजातील सर्व विद्यार्थ्यांना समान शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी समावेशित शिक्षणाची संकल्पना विकसित झाली ,या संकल्पनेनुसार शारीरिक, मानसिक, बौद्धिक किंवा सामाजिक दृष्ट्या वेगळ्या असलेल्या विद्यार्थ्यांना मुख्य प्रवाहातील शिक्षणामध्ये सहभागी करून घेतले जाते. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 20-20 मध्ये समावेशित शिक्षणातील कला आधारित शिक्षणातून विद्यार्थ्यांचा विकास व्हावा त्यांच्या क्षमता आणि आवडीनुसार शिक्षणाची संधी मिळावी याकरिता कला सलग्न शिक्षणाचा वापर करण्यात आला; तसेच समावेशक आणि आनंददायी शिक्षणाची तरतूद केली आहे जेणेकरून सर्व प्रकारच्या विद्यार्थ्यांना विशेषता दिव्यांग आणि वंचित गटातील विद्यार्थ्यांना शिक्षण प्रक्रियेत सहभागी करून घेण्यासाठी कला,संगीत,नाट्य, नृत्य आणि हस्तकलेचा वापर करण्याची शिफारस करण्यात आली आहे; ज्यामुळे त्यांचा सहभाग आणि अभिव्यक्ती वाढते

## समावेशित शिक्षण संकल्पना

भिन्न क्षमता असूनही विशेष गरजा असलेल्या बालकांना सामान्य बालकासमवेत एकाच वर्गात शिकण्याची'समान संधी ज्या शिक्षणात दिली जाते त्यास समावेशित शिक्षण म्हणतात ;हे शिक्षण 'समान संधी' तत्वावर आधारलेले असून या शिक्षण पद्धतीच्या मुख्य प्रवाहात सर्वांचा स्वीकार केल्या जातो. 1960 मध्ये सर्वांसाठ शिक्षण(education for all) ही संकल्पना जगातील अनेक देशात अस्तित्वात आली होती संकल्पनेस हळूहळू चालना मिळून तिचा 1981 च्या काळात प्रसार होऊ लागला 1990 मध्ये सर्वांसाठी शिक्षण या संकल्पनेतून समावेशक शिक्षण या संकल्पनेचा उदय झाला 1994 मध्ये भारतासह एकूण 92देशांनी आणि पंचवीस शैक्षणिक संघटनांनी संकल्पनेस मान्यता दिली व स्वीकारलेली आहे. 1999 मध्ये युनेस्को,(United Nations

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

educational scientific and cultural organisation) या संस्थेने नियमित शाळेतील भिन्न मुलांच्या गरजा नुसार सर्वांसाठी अध्ययन कार्यनीती विकसित करावी असे सुचविले, युनेस्कोच्या मते वंचित बालके, युवक, प्रौढ यांच्या अध्ययन गरजांचा शोध घेत लक्ष केंद्रित करणारा विकासात्मक उपागम म्हणजे 'समावेशित शिक्षण' होय. समावेशित शिक्षणाचे प्रमुख उद्दिष्ट म्हणजे शिक्षणामध्ये समानता सामाजिक न्याय आणि सर्वसमावेशकता निर्माण करणे यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याला स्वतःची क्षमता विकसित करण्याची संधी मिळते

## कला आधारित शिक्षणाची संकल्पना

कला आधारित शिक्षण ही एक अशी शैक्षणिक संकल्पना आहे ,ज्यामध्ये विविध विषयांचे शिक्षण देण्यासाठी कला माध्यमांचा(उदा-चित्रकला संगीत नाटक नृत्य हस्तकला) वापर केला जातो.. यात केलेला केवळ एक विषय म्हणून न शिकवता शिकवण्याची माध्यम बनवते कला शिक्षणातून विद्यार्थ्यांमध्ये एकएक विशिष्ट सौंदर्यदृष्टी जोपासली जावी तिचा उपयोग त्यांच्या दैनंदिन जीवनात वस्तूंची निवड मांडणी सजावट ,गृहशोभन, बागकाम आदी बाबी मध्य व्हावा अशी ही एक भूमिका असते प्रत्येक बालकाला सौंदर्य विषयक संवेदनक्षमता असते व तिच्या विकासासाठी कलेच्याद्वारे आपल्या विचारांची भावनांची व कल्पनांची अभिव्यक्ती करण्याची भरपूर संधी त्याला शिक्षणात उपलब्ध झाली पाहिजे या प्रकारच्या कलात्मक अविष्कारामुळे त्याच्या व्यक्तिमत्व विकासाला विघातक ठरणाऱ्या सहज प्रवृत्तीक अनिष्ट उर्मींचे उदात्तीकरण होते व त्यांचा कोंडमारा होत नाही. मनोविकासाचे प्रभावी साधन या दृष्टीने या विषयाचा अंतर्भाव शिक्षणामध्ये एक आवश्यक अंग म्हणून करण्यात आला आहे. कला आधारित शिक्षण पद्धतीमध्ये विद्यार्थी प्रत्यक्ष कृतीद्वारे शिकतात त्यामुळे त्यांची कल्पनाशक्ती, निरीक्षण क्षमता, समस्या सोडविण्याची क्षमता आणि सर्जनशीलता विकसित होते.

## कला आधारित शिक्षणाच्या विविध पद्धती

**चित्रकला आधारित शिक्षण**-चित्राच्या माध्यमातून विद्यार्थी संकल्पना सहजपणे समजू शकतात विशेषतः बौद्धिक किंवा भाषिक अडचणी असलेल्या विद्यार्थ्यांसाठी ही पद्धती उपयुक्त ठरते.

**संगीत आधारित शिक्षण**-गाणी कविता आणि ताल यांच्या साह्याने विद्यार्थ्यांना विविध विषय शिकवता येतात संगीतामुळे स्मरणशक्ती आणि एकाग्रता वाढते .

**नाट्य आधारित शिक्षण** -भूमिका नाट्य आणि अभिनय विद्यार्थ्यांना अनुभवातून शिकण्याची संधी देतात त्यामुळे संवाद कौशल्य विकसित होते आणि आत्मविश्वास वाढतो .

**नृत्य आधारित शिक्षण**-नृत्यामुळे विद्यार्थ्यांचा शारीरिक समन्वय आत्मविक्ती आणि सामाजिक सहभाग वाढतो

**हस्तकला आधारित शिक्षण**-हस्तकलेच्या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांची सूक्ष्म हालचाल कौशल्य सर्जनशीलता विकसित होऊन एकाग्रता वाढते .

**समावेशित शिक्षण आणि कला आधारित शिक्षण यांचा परस्पर संबंध** समावेशित शिक्षण आणि कला आधारित शिक्षण यांचा परस्परांशी अतिशय कनिष्ठ आणि पूरक संबंध आहे एन इ पी(NEP)
2020(NCF)2020 या दोन्ही संकल्पना एकत्र येऊन सर्व विद्यार्थ्यांसाठी शिक्षण अधिक आनंददायी अर्थपूर्ण आणि सुलभ बनवतात.

या दोन्ही संकल्पना मधील परस्पर संबंध खालील मुद्द्याद्वारे स्पष्ट करता येतो

## शिकण्याची विविध शैली (learning styles)

प्रत्येक मुलाची शिकण्याची गती आणि पद्धत वेगळी असते'

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

'समावेशित वर्गात'काही मुले दृश्य आणि श्राव्य तर काही कृतिशील असतात कला आदर्श शिक्षणामुळे संगीत नाटक नृत्य आणि चित्रकला यासारख्या विविध माध्यमांचा वापर करून एकाच वेळी अनेक ज्ञानेंद्रियांचा विकास होतो ज्यामुळे विशेष गरजा(SCN -special education needs)असलेल्या विद्यार्थ्यांना सोपे जाते.

**भावनिक सुरक्षितता आणि सर्वसमावेशकता-**

कला ही एक सार्वत्रिक व गैर शाब्दिक संवाद आहे, भावनिक किंवा शारीरिक अडचणी असलेल्या मुलांना स्वतःला शब्दात व्यक्त करणे कठीण जाऊ शकते अशा वेळी 'कला'त्यांना स्वतःला अभिव्यक्त करण्याचे एक सुरक्षित आणि गैर स्पर्धात्मक माध्यम पुरविणे ज्यामुळे वर्गात समानतेचे आणि स्वीकाराचे वातावरण निर्माण होते

**अमूर्त संकल्पना सोप्या करणे –**

गणित, विज्ञान किंवा सामाजिक शास्त्र यासारख्या विषयातील कठीण व अमूर्त संकल्पना समजून घेण्यासाठी कलेचा वापर उत्कृष्ट साधन ठरते उदाहरणार्थ-नाटकाच्या माध्यमातून ऐतिहासिक घटना शिकवणे किंवा चित्रकलेच्या माध्यमातून भूमितीतील आकार समजून घेणे

**तणाव मुक्ती आणि सहकार्य –**

कलात्मक उपक्रमामध्ये भाग घेतल्याने मुलांमधील ताण तणाव कमी होतो जबरदस्तीने पाठांतर करण्यापेक्षा मुले स्वतःच्या कल्पकतेने शिकतात सामूहिक कला प्रकल्प(उदा-भित्तिचित्र/group music) राबविल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक कौशल्य, सहानुभूती आणि परस्पर सहकार्याची भावना वाढीस लागते.

**शिक्षकांसाठी प्रभावी साधन-**

विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांना मुख्य प्रवाहात आणताना शिक्षकांना अनेक आव्हानांचा सामना करावा लागतो अशावेळी कला आधारित अध्यापन पद्धती शिक्षकांना एक लवचिक आणि नाविन्यपूर्ण साधन (pedagological tool) पुरवते त्यामुळे प्रत्येक मुलाच्या अद्वितीय क्षमतेचा (Howard Gardner's theory of multiples intelligences) पुरेपूर वापर करून घेता येतो.

**समावेशित शिक्षणामध्ये कला आधारित शिक्षणाची उद्दिष्टे**

समावेशित शिक्षणामध्ये कला आधारित शिक्षण हे विशेष गरजा असलेल्या आणि सर्वसामान्य विद्यार्थ्यांना एकत्र आणून शिकवण्याचे एक शक्तिशाली साधन आहे

समावेशित शिक्षणात कला आधारित शिक्षणाचे मुख्य उद्दिष्टे खालील प्रमाणे आहेत.

**समान संधी देणे**-कलेमुळे सर्व विद्यार्थ्यांना विशेषता शारीरिक किंवा मानसिक अक्षमता असलेल्या मुलांना स्वतःला व्यक्त करण्याची समान संधी मिळते.

**शिकणे सोपे करणे**-उदाहरणार्थ गणित किंवा भाषेसारखे विषय गाणी, नाटक ,चित्राच्या माध्यमातून सोपी आणि आनंददायी बनतात .

**आत्मविश्वास वाढवणे**-कलेच्या विविध प्रकारांमुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळतो त्यामुळे त्यांचा आत्मविश्वासाने शिकण्याची आवड वाढते.

**भावनात्मक विकास**-कलेच्या माध्यमातून मुले (राग, आनंद ,दुःख )सुरक्षितपणे बाहेर पडू शकतात त्यामुळे त्यांचा ताण कमी होतो .

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

**समावेशन**-कला ही एक अशी भाषा आहे ज्याला शब्दांची गरज नसते त्यामुळे विशेष मुले आणि सामान्य मुले एकमेकांच्या अधिक जवळ येतात.

### समावेशित शिक्षणामध्ये कला आधारित शिक्षणाचे महत्त्व

**विद्यार्थ्यांच्या विविधतेचा स्वीकार**-प्रत्येक विद्यार्थ्यांची शिकण्याची पद्धत वेगळी असते काही विद्यार्थी दृश्य माध्यमातून चांगले शिकतात तर काही विद्यार्थी श्राव्य माध्यमातून किंवा कृती आधारित पद्धतीने शिकतात कला आधारित शिक्षण सर्व प्रकारच्या विद्यार्थ्यांना शिकण्याची समान संधी देते.

**सामाजिक समावेशन**- कला उपक्रमामध्ये समूह कार्याला महत्त्व असते त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये सहकार्य, परस्पर आदर ,संवाद कौशल्य आणि सामाजिक समायोजन विकसित होते.

**सर्जनशीलता विकसित करणे**-विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला कला चालना देते विविध कलात्मक उपक्रमामुळे त्यांची उपक्रमशीलता , सर्जनशीलता, विचार शक्ती वाढते.

### समावेशित शिक्षणामध्ये कला आधारित शिक्षणाचे फायदे खालील प्रमाणे



EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

समावेशित शिक्षणामध्ये कला आधारित शिक्षण ही अत्यंत प्रभावी आणि उपयुक्त अध्यापन पद्धती आहे. ती विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देते. कला विद्यार्थ्यांमधील विविधता स्वीकारण्यास मदत करते आणि शिक्षण अधिक आनंददायी, अर्थपूर्ण व सर्वसमावेशक बनवते. विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांसाठी कला ही आत्मअभिव्यक्तीचे प्रभावी साधन ठरते. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ने देखील कला-एकात्मिक शिक्षणाला विशेष महत्त्व दिले आहे. त्यामुळे समावेशित शिक्षणाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी कला आधारित शिक्षणाचा व्यापक वापर करणे आवश्यक आहे. अशा प्रकारे कला आधारित शिक्षण समतामूलक, गुणवत्तापूर्ण आणि सर्वसमावेशक शिक्षणव्यवस्था निर्माण करण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान देत.

## संदर्भसूची

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) 2020.

NCERT (2006), Position Paper on Arts, Music, Dance and Theatre.

UNESCO (1994), Salamanca Statement on Inclusive Education.

Best, J.W. – Research in Education.

MHRD, Government of India – Inclusive Education Guidelines.

Aggarwal, J.C. – Educational Psychology and Inclusive Education.

Teacher's Welfare is Nation's Welfare
CTEF
Council for Teacher Education Foundation
ESTD. 1985